**रे. दि. मु. क्रमांक १७४/२०१३ मधील नि.क्र. १२९ खालील आदेश.**
**शंकर राऊत -विरुध्द- प्रकाश कांबळे**
**आदेश पारित दिनांक २२.११.२०२२**

---

वादीतर्फे प्रस्तूतचा अर्ज मयत वादी शंकर कोंडीबा राऊत यांचे वारस मुदतीत अभिलेखावर न घेतल्यामुळे झालेला दावा संपुष्टाचा (abatement) हुकूम रद्द होवून मिळणेकरिता दाखल केला आहे.

०२. प्रस्तूत अर्जात वादीने असे कथन केले आहे की, सदरचा दावा चालू असताना या दाव्यातील वादी शंकर कोंडीबा राऊत हे दिनांक २३.०९.२०२१ रोजी मौजे शिरवळ, ता. खंडाळा येथे मयत झाल्या आहेत. सदर दाव्याचा निकाल गुणदोषावर होणेकरिता सदर मयत वादी यांचे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक होते. परंतु, वादीने सदर मयत वादी शंकर यांचे वारस मुदतीत रेकॉर्डवर घेणेस विलंब झाला व त्याचेविरुध्द अ‍ॅबेटमेंटचा हुकूम झाला आहे त्यामुळे प्रस्तूतचा अर्ज मंजूर करणेची विनंती केली.

०३. प्रस्तूत अर्जावर प्रतिवादी यांना संधी देवून देखील त्यांनी आपले म्हणणे दाखल केलेले नाही. सबब, दिनांक १९.१०.२०२२ रोजी सदरचा अर्ज प्रतिवादी यांचेविरुध्द विना म्हणणे चालविण्याचा आदेश पारित करण्यात आला.

०४. अभिलेखावर उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या आधारे व सदर अर्जात नमूद केलेल्या कारणास्तव वादी व प्रतिवादी यांच्यामधील वाद संपुष्टात आणण्याकरिता

दोन्ही पक्षांना संधी देणे योग्य वाटते. तसेच, मयत वादी शंकर राऊत यांचे वारस मुदतीत अभिलेखावर न घेतल्यामुळे झालेला दावा संपुष्टाचा (abatement) हुकूम रद्द करणे न्यायोचित वाटते. परंतु, प्रस्तूत अर्ज दाखल करणेस वादीस विलंब झाल्याने प्रस्तूत अर्जावर कॉस्ट करणे हे नैसर्गिक न्याय तत्वाच्या दृष्टीने योग्य वाटते. सबब, मी खालील आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वादीचा निशाणी क्र. १२९ चा अर्ज रक्कम रुपये २००/- (अक्षरी रक्कम रुपये दोनशे फक्त) इतक्या कॉस्टवर मंजूर करणेत येतो. सदर कॉस्टची रक्कम तालुका विधी सेवा समिती, खंडाळा येथे जमा करावी.

२. मयत वादी शंकर राऊत यांचे वारस मुदतीत अभिलेखावर न घेतल्यामुळे झालेला दावा संपुष्टाचा (abatement) हुकूम रद्द करणेत येतो.

३. सदर आदेशाची दोन्ही पक्षकारांनी नोंद घ्यावी.

दिनांकः- २२.११.२०२२

(अ. क. दामटे)
प्रभारी सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, खंडाळा.